# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/08/2023 (शुक्रवार) सकाळ

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कुही :– अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा चांपा येथे दिनांक १७/०८/२०२३ चे ०७.०० वा. ०७.३० वा. दरम्यान कुही पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन कुही पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन मुखबीरव्दारे मिळालेल्या खबरेवरून वाहन क्र. एम. एच.– ४९ ए.टी –८७११ चे चालकाला वाहन थांबविण्याचा ईशारा करून चालकाने वाहन थांबविले असता सदर वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनात **आरोपी नामे– १) किशोर पद्माकर छापेकर, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ३ चांपा २) नाजीर लुकमान कुरेशी, वय ४३ वर्ष, रा. ताजबाग झोपडपट्टी नागपूर** याच्या ताब्यातून १) एक पांढऱ्या रंगाचा बैल किंमती १००००/– रू. २) ०३ लाल रंगाचे गोरे प्रत्येकी ५०००/–रू. प्रमाणे १५०००/–रू. ३) एक कोसा रंगाची लहान गोरी किंमती ५०००/– ४) वाहन क्र. एम. एच.– ४९/ए.टी –८७११ किंमती ४०००००/– रू असा एकुण ४३००००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून जनावरांना निर्दयतेने वागणुक देवुन वाहतुक करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नायक ग्यानीवंत गुरपुडे ब. नं. ५४८ पो.स्टे. कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१) (ब), ११(१) (ड), ११(१) (सी) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम १८४, १३०, १७७ मोवाका. सहकलम १०९ भादवि. काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव कुथे ब. नं. ७२० पो.स्टे. कुही हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. बेला :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा निशानघाट येथे दिनांक १५/०८/२०२३ चे १४/०० वा. ते दिनांक १६/०८/२०२३ चे १६/०० वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे– सौ. दुर्गा किशोर अलाम, वय ३५ वर्ष, रा. निशानघाट ता. उमरेड जि. नागपुर याचे शेताला लागुन असलेल्या नाल्यावरील जिल्हा परिषद पाटबंधारे विभागा तर्फे बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याच्या नाल्याच्या काठावर ठेवलेल्या पाणी अडवण्याच्या १२ लोंखडी प्लेटा अंदाजे किंमती अंदाजे १२,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजय चौधरी पोस्टे बेला हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर